# तुळसी विवाह

करूनी हिरवा शृंगार वृंदा फुलली
येताच अंगणात ही तुळस माझ्याशी बोलली ....
वदली ती वधू बनूनी धन्य जाहले
अमृतवर्षावात जणु आज न्हायले
याची डोळी सौख्य माझे पाहिले
दामोदरासवे जेव्हा आनंदाने प्रीतीफुले वेचिली
येताच अंगणात ही तुळस माझ्याशी बोलली ॥१॥ ....
अर्था आले जीवन, झाले कृतार्थ
इच्छीत हृदयीचे आज झाले सार्थ
विवाह दिनी माझिया काय होते दुःखी व्यर्थ ??
असे म्हणूनी माझ्यासमोर ती झुकली
येताच अंगणात, ही तुळस माझ्याशी बोलली ॥२॥ ....
म्हणाली, होवूनी नाराज, गाळू नकोस डोळ्यातून पाणी
ध्यानात ठेव गं, माझी ही उत्स्फूर्त वाणी
कांही दिवसांनी होशील तू तुझ्या जिवलगाची राणी
प्रसन्न वदनाने मग हात जोडीता मंजिरीसह ती हसली
येताच अंगणात ही तुळस माझ्याशी बोलली ॥३॥ ....

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.

